सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/सामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-२/२२३ ठ. क्र. ४५९
दि. २०।९।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-२/२२३

मराठा समाजाच्या विविध मागण्या करीता सोलापूर शहरामध्ये दि.२१/९/२०१६ रोजी मराठा समाजाच्या वतीने महामोर्चा आयोजित करण्यात आलेला असून सदर मोर्चेचे विसर्जन हे होम मैदान येथे होणार असून सदर ठिकाणी श्रध्दांजलीच्या कार्यक्रम होऊन राष्ट्रगीतानंतर मोर्चाचे विसर्जन होणार आहे. यास्तव सदर ठिकाणाचे कार्यक्रमानिमित्त मराठा समाजाकरीता सदरची होम मैदानाची जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यास हि सभा मान्यता देत आहे आणि सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मोर्चेकरी करीता ज्या आत्यवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यास मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात येत असून येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या महकूब/मान्य/विलंब
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १०६ ठ. क्र. १६०
दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. एस. जी. कांबळे, सेवानिवृत्त वरिष्ठ श्रेणी लिपीक, जयभवानी प्रशाला, यांचे सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार २४ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर दुसरा वेतन लाभ मंजूर करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मुख्यलेखापरिक्षक व विधानसल्लागार यांचे अभिप्रायांचा विचार करता श्री. कांबळे, वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचे वेतनाचे अनुदान मा. शासनाकडून देणेत येत असून त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देणेस हरकत दिसून येत नाही तसेच मा. शासन निर्णय दि. १ एप्रील २०१० नुसार सेवानिवृत्तीनंतर उच्च वेतन संरचना लागू करणेस व त्यानुसार फेरवेतननिश्चिती करणेस तसेच दि. १-४-२०१० शासन निर्णयाप्रमाणे दि. १-४-२०१० ते दि. ३०-४-२०१० पर्यंत रुपये १९५००/- प्रमाणे वेतन व दि. १-५-२०१० पासून सेवानिवृत्ती नंतरचे सर्व फायदे आदा करणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

श्री. एस. जी. कांबळे, सेवानिवृत्त वरिष्ठ श्रेणी लिपीक, जयभवानी प्रशाला यांचे सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती एकाकी पद योजनेनुसार २४ वर्षे सेवा पुर्ण झाल्यानंतर दुसरा वेतन लाभ मंजूर करणेबाबत तसेच मा. शासन निर्णय दि. ५ जुलै २०१० नुसार सेवानिवृत्तीनंतर उच्च वेतन संरचना लागू करणेस व त्यानुसार फेरवेतननिश्चिती करणेस तसेच दि. १-४-२०१० शासन निर्णयाप्रमाणे दि. १-९-२००६ ते दि. ३०-४-२०११ पर्यंत अनुदेय वेतनाप्रमाणे वेतन दि. १-५-२०११ पासून सेवानिवृत्ती नंतरचे सर्व फायदे व मा. उच्च न्यायालय मुंबई दावा क्र. ५१५२/८९ दि. ०४-०९-२००३ च्या निकालाप्रमाणे आदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १०७ ठ. क्र. १६९
दि. ५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील अपंगांना (दिव्यांग) शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ मिळणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सन २०१६-१७ अपंगासाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतूद र.रु. ३.०० कोटी मर्यादेमध्ये मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२१, दिनांक १४-१०-२०१५ ने मान्यता दिलेली आहे. गतवर्षी १ कोटी मधून २६.०० लाख परिवहन उपक्रमास अपंग सहाय्य योजनेअंतर्गत अपंग मोफत बस प्रवास करिता दिली आहे. आजला ३ कोटी रक्कमेतून परिवहन विभागास किती रक्कम द्यावयाची आहे याचेही धोरण मा. सर्वसाधारण सभेकडून ठरविणे आवश्यक आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने १ ते १३ पैकी आयटम प्रकरणातील पान नं. ११७ क्र. २,५,६,९,१० व लोखंडी स्टॉल, पिठाची गिरणी, उत्पादक वस्तू, सोलर कुकर इ. देऊ नये असा ठराव पारित केलेला आहे. पैकी आयटम क्र. ५ बाबत प्रस्तावामधील ३ क मध्ये नमूद केलेले आहे. उर्वरीत आयटम क्र. १,३,४,५,७,८,११,१२,१३ देणेसाठी याकामी निश्चित केलेल्या नियम व अटीचे पालन करुन आजला शहरामध्ये असलेल्या दिव्यांगाकडून जाहिर प्रसिध्दीकरणाने अर्ज मागवून त्याची दिव्यांगाबाबतच्या पात्रतेबाबत त्यांचेप्रमाणे पत्र मा. वैद्यकीय समिती मार्फत छाननी करुन कोणत्या अर्जावर कोणते साहित्य मिळण्यास पात्र आहे किंवा त्यांनी मागणी केलेले साहित्य त्यांना नियमाप्रमाणे मिळू शकेल किंवा नाही याबाबत निर्णय घेणेसाठी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा. सहा. आयुक्त (स), मा. आरोग्याधिकारी, मा. मुख्यलेखापरिक्षक व सचिव म्हणून कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी यांची समिती गठीत करणे योग्य होणार आहे. तद्नंतर अंतीम निर्णयास्तव शर्ती अटीमध्ये नमूदप्रमाणे मा. कामगार कल्याण व समाज कल्याण समितीस अधिकार आहे त्याप्रमाणे कार्यवाही ठेवणे योग्य होणार आहे. वरील प्रस्तावित कार्यवाहीस तसेच आयटम १ ते १३ पैकी कोणते आयटम निश्चित करणे व लॅपटॉप पात्रतेचे अटीचे धोरण व सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेकडून धोरणात्मक निर्णय होणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर शहरातील अपंगांना (दिव्यांग) शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ मिळणेकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करणेत येत आहे.

१) मा. महापौर

२) मा. उपमहापौर

३) मा. अध्यक्ष स्थायी समिती

४) मा. सभागृह नेता - कन्वेनर

५) मा. विरोधी पक्षनेता

६) मा. गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस

७) मा. गटनेता शिवसेना

८) मा. गटनेता ब.स.पा./मा.क.पा.

९) मा. रोहिणी रामचंद्र तडवळकर

१०) मा. देवेंद्र तिमप्पा भंडारे

११) मा. राजकुमार बाबूराव हंचाटे

वरीलप्रमाणे नेमणेत आलेल्या समितीस निर्णय घेण्याचा अधिकार प्रदान करणेत येत असून, यास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज १०८ ठ. क्र. १६२ दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



ध्वनीमापक यंत्र पोलीस आयुक्तालय कार्यालय सोलापूर शहर यांना खरेदी करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये संबंधित पोलिस प्राधिकरणास महानगरपालिकेमार्फत ध्वनीमापक यंत्र पुरविण्याचे आदेश प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. १ ने प्राप्त झाले असून, त्या अनुषंगाने सदर ध्वनीमापक यंत्राबाबत नेट वरुन चौकशी केली असता, अशा प्रकारचे पुरविणारे कंपनी सुचेत सिस्टीम, पुणे यांचेकडून टेस्टो कंपनी मॉडेल नं. ८१५ चे र.रु. २५,७००/- प्रति नग व अधिक १२.५% व्हॅट तसेच P&F १% असे एकूण र.रु. २९,१६९/- प्रति नगचे दर दिलेले आहेत. सोलापूर शहराकरिता मा. पोलीस उप आयुक्त सोलापूर शहर यांचे मागणीप्रमाणे १०० नग खरेदी करणेकामी अंदाजे र.रु. ३०.०० लाख इतका खर्च अपेक्षित असून, सदरचा खर्च करणेकरिता बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील अ.क्र. ३९ शहरात व जलशुध्दी केंद्रात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे या तरतूदीतून सदर कामासाठी र.रु. ३०.०० लाखाची तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 108 ठ. क्र. 963
दि. 05/10/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १६ ब एक्कलदेवी पिठाची गिरणी ते चिरमुरे भट्टी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पुर्वगणनपत्रक क्र. २०/२०१६१७ र.रु. १९,९९,७४५/- इतकेचे तयार केले असून प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ११४ ठ. क्र. १६४
दि. ०५/१०/१६ रोजी आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आर्किटेक्ट श्री. संतोष किर्तने यांना देणेत आलेल्या फी बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव माहे एप्रील २०१६ कार्यपत्रिका क्र. १ ची दि. १८-५-१६ रोजीच्या सभेमध्ये लक्षवेधीच्या माध्यमातून विचारणा करणेत आलेल्या माहितीबाबत आर्किटेक्ट संतोष किर्तने यांची मनपा पॅनल आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती आहे. त्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. २४५२ दि. २०-२-२०१० ने मान्यता देणेत आलेली आहे. पुन्हा मा. स्थायी समिती ठराव क्र. ३६५ दि. ३१-१-२०१४ ने नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर पॅनलमध्ये श्री. किर्तने यांचेसह एकूण आठ आर्किटेक्ट यांची नियुक्ती पाच वर्षाकरिता मंजूर आहे. श्री. किर्तने यांना आतापर्यंत नगरअभियंता खात्याकडून अदा करणेत आलेल्या फी ची माहिती प्रस्तावा सोबतच्या तक्त्याप्रमाणे आहे. सदरची माहिती मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस मा. उपायुक्त यांनी प्र. नगरअभियंता यांचेमार्फत मा. आयुक्त यांचेकडे दिनांक १-६-१६ रोजी निवेदन सादर केले असता मा. आयुक्तांचे आदेशानुसार पुनःश्च मा. आयुक्त यांचेकडे दिनांक १६-६-१६ अन्वये निवेदन सादर केले असून त्यानुसार मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. महाराष्ट्र शासनाने निश्चित केल्यानुसार आर्किटेक्टचे एक पद निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १२६ ठ. क्र. १६५
दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहा कन्सल्टन्सी व UIDSSMT योजने अंतर्गत व झालेल्या कामाबाबतची माहितीबाबत मा. सर्वसाधारण सभा दिनांक १६-५-१६ मधील मा. महापौर यांनी दिलेले आदेश व दिनांक १०-६-१६ च्या सर्वसाधारण सभेतील पाणी पुरवठया संबंधित चर्चेच्या अनुषंगाने दिलेले आदेशाबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, शहा कन्सल्टन्सी योजना या योजनेबाबत सध्य स्थितीला उपलब्ध असलेली माहिती व UIDSSMT या योजनेबाबत नमूद केलेली आहे. त्याबाबत अवलोकन होऊन सदरचे माहितीचे अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीने आलेल्या अहवालाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. १२८ ठ. क्र. १६६
दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. केंद्र शासन पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजनेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. केंद्र शासन पुरस्कृत सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करणेसाठी प्रस्तावा सविस्तर महिति असून **१)** आहे त्या ठिकाणी सोलापूर स्मार्ट सिटीतील रेट्रोफिटींग एरिया व महापालिकेच्या जागेवर १९ झोपडपट्टयांचा विकास करणे **२)** कामाची रक्कम - र.रु. ३९८.०६ कोटी **३)** एकूण झोपडपट्टया -१९ **अ)** मनपा मालकी -११ **ब)** सरकारी -१ **क)** खाजगी - ७ प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेची माहिती असून झोपडपट्टया व्यतिरिक्त म्हणजेच योजना क्र. २,३,४ मध्ये करावयाचे डिमांड सर्व्हेक्षण करणेचे नियोजन या विभागाकडून करणेत आले असून प्रस्तावात नमूद सर्व महितीच्या आधारे सर्वांसाठी घरे कृती आराखडा ( HFAPOA ) तयार करणेत येऊन त्या आधारे प्रकल्प प्रस्ताव तयार करुन ते मंजूरीस्तव शासनाकडे सादर करणेचे आहे. सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करणे करिता विहीत कालावधी निहाय नियोजन तयार करुन सोबत जोडले आहे. तसेच या योजनेचे सादरीकरण याची विस्तृत माहिती मराठीत अनुवाद केलेले योजनेचे मार्गदर्शक तत्वे आम्ही मा. पदाधिकारी, मा. सदस्य एकूणच मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करणार आहोत. तरी प्रस्तावात नमूद सर्व बाबी माहितीस्तव मा. सर्वसाधारण सभेस सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. १३-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासलो/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १२८ ठ. क्र. १६७ दि. ५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील व हद्दवाढ भागातील पाण्याच्या टाकींना कंपाऊंडवॉल संरक्षित भिंत बांधणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव **१)** प्रभाग क्र. १८ विडी घरकुल जवाहर नगर येथे पूर्वगणनपत्रक क्र. १५ र.रु. १४,८४,२७०/- **२)** एमआयडीसी संप हाऊस करिता पूर्वगणनपत्रक क्र. १६ र.रु. १३,११,६३५/- **३)** आदित्य नगर येथे पूर्वगणनपत्रक क्र. १७ र.रु. १५,३३,३३४/- **४)** जुळे सोलापूर एच.एस.आर. पाण्याची टाकी करिता पूर्वगणनपत्रक क्र. १८ र.रु. ६२,१९,८३०/- **५)** भद्रावती पेठ पाण्याची टाकी करिता पूर्वगणनपत्रक क्र. १९ र.रु. ५,३२,५२०/- **६)** अवंती पाण्याची टाकी करिता पूर्वगणनपत्रक क्र. २० र.रु. १५,३२,६५०/- **७)** सेटलमेंट पाण्याची टाकी करितापूर्वगणनपत्रक क्र. २१ र.रु. १५,८८,४२०/- **८)** कोंडी एम.बी.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २२ र.रु. १५,१४,९४०/- **९)** प्रताप नगर नवीन ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २३ र.रु. १०,०२,८२०/- **१०)** प्रताप नगर जुनी ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २४ र.रु. ३,७२,८३५/- **११)** सोरेगांव जुनी ई.एस.आर. करिता पूर्वगणनपत्रक क्र. २५ र.रु. ३,७२,८३५/- **१२)** प्रभाग क्र. ४ मेहताब नगर ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २६ र.रु. १४,८४,३००/- **१३)** प्रभाग क्र. ३ दहिटणे कण्णी प्लॉट ई.एस.आर. करिता पूर्वगणनपत्रक क्र. २७ र.रु. १०,५८,५१०/- **१४)** प्रभाग क्र. १७ विडी घरकुल एबी ग्रुप ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २८ र.रु. १५,४५,१००/- **१५)** देगांव गावठाण भागात ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. २९ र.रु. ३७,०९,५६१/- **१६)** देगांव बसवेश्वर नगर ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. ३० र.रु. ३७,०९,५६१/- **१७)** केगांव ई.एस.आर. करिता पूर्वगणनपत्रक क्र. ३१ र.रु. १५,३२,६५०/- **१८)** शांती नगर ई.एस.आर.करिता पूर्वगणनपत्रक क्र. ३२ र.रु. १८,६४,९०५/- **१९)** कुमठे गावठाण येथील ई.एस.आर. करिता पूर्वगणनपत्रक क्र. ३३ र.रु. १२,०१,७६३/- असे एकूण १९ ठिकाण कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १५ ते ३३ एकूण र.रु. ३,३५,७२,४३९/- इतक्या रक्कमेचे तयार करणेत आले असून सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पाण्याच्या टाक्यासाठी कंपाऊंडवॉल बांधणे या सदरी फक्त र.रु. २०.०० लाखाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तसेच या र.रु. २०.०० लाखाची तरतूदीतून नेहरु नगर पाण्याच्या टाकीसाठी कंपाऊंडवॉल बांधणे र.रु. ७.९२ लाखाची अभिप्राय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे या सदरी फक्त र.रु. १२.०८ लाखाची तरतूद शिल्लक असून, या शिल्लक तरतूदीतून नव्याने बांधण्यात येणा-या एकूण १९ टाक्यासाठी संरक्षक भिंत बांधणेकामी बजेट अपूरी पडणार आहे. त्यामुळे विषयांकित कामी बजेट तरतूद उपलब्ध नसल्याने सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/उजनी पाकणी सोरेगांव भवानी पेठ येथे फ्लो मिटर बसविणे या सदरी र.रु. १०००/- लाखाची तरतूद असून सदर तरतूदीमधून नमूद कामे करणे शक्य होणार असल्याने बजेट तरतूद उपलब्ध होणे व तसेच प्रत्येक कामाचे स्वतंत्र पूर्वगणनपत्रकास मान्यता मिळणेकामी प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेपुढे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. १३-७-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ११७ ठ. क्र. १६८ दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



न्यू ति-हेगांव फॉरेस्ट येथील श्री. संजय ताराचंद गवळी यांचे घराशेजारी असलेल्या चौकास **गवळी वाडा चौक** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका